# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (भारतीय रेल्वेला महाराष्ट्रातील त्यांच्या वीज वितरण कार्यासाठी लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१९

**विद्युत अधिनियम, २००३**

**क्र.मविनिआ/तांत्रिक/ परवाना अटी/रेल्वे/२०१९/---- :** विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१ च्या उप-कलम (२) च्या खंड (डी) सह कलम १६ आणि कलम १४ च्या खंड (बी) मधील अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे खालील विनियम करीत आहे:-

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ**

१.१ या विनियमांना **"महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (भारतीय रेल्वेला महाराष्ट्रातील त्यांच्या वीज वितरण कार्यासाठी लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१९"** असे म्हणावे.

१.२ हे विनियम भारतीय रेल्वेच्या महाराष्ट्र राज्यातील मध्य परिमंडल, पश्चिम परिमंडल, दक्षिण मध्य परिमंडल आणि दक्षिण पूर्व मध्य परिमंडलाच्या अखत्यारीतील आणि संचालनविषयक नियंत्रणाखालील वीज पुरवठा क्षेत्रासाठी लागू राहतील;

१.३ हे विनियम शासकीय राजपत्रात ज्या दिनांकास प्रसिध्द होतील त्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२ व्याख्या :**

**२.१** या विनियमांत, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर :-

(ए) **"अधिनियम"** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६);

(बी) **"सर्वसाधारण अटी"** म्हणजे, वेळोवेळी अंमलात असलेल्या, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्वसाधारण अटी;

(सी) **"पदस्थ परवानाधारक"** म्हणजे या विनियमांतर्गत पदस्थ परवानाधारक म्हणजे असा वितरण परवानाधारक ज्याच्याकडून भारतीय रेल्वे मुक्त प्रवेश घेण्यापूर्वी एक ग्राहक म्हणून वीज पुरवठा घेत होती.

(डी) **“भारतीय रेल्वे”** म्हणजे रेल्वे मंत्रालयाच्या अधिनस्थ असलेला भारत सरकारचा एक विभाग, ज्याचे मुख्यालय रेल भवन, रायसिन रोड, नवी दिल्ली-११०००१ येथे असून रेल्वे अधिनियम, १९८९ च्या तरतुदींनुसार जो मध्य परिमंडल, पश्चिम परिमंडल, दक्षिण मध्य परिमंडल आणि दक्षिण पूर्व मध्य परिमंडलाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यातील रेल्वे यंत्रणेचे संचालन करीत आहे;

(जी) **“रेल्वे अधिनियम”** म्हणजे रेल्वे अधिनियम, १९८९;

२.२ (अ) या विनियमांत वापरलेल्या आणि ज्यांच्या व्याख्या करण्यात आलेली नाही अशा शब्द आणि उक्तींना, विद्युत अधिनियम, २००३ आणि विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम आणि विनियमांनुसार, अर्थ राहील;

(ब) या विनियमांच्या मराठी अनुवादातील व इंग्रजी विनियमांमधील कोणत्याही शब्दांचा/मजकुराचा अर्थ निश्चित करताना कोणताही वाद उद्‌भवल्यास आणि/किंवा कोणतीही विसंगती आढळल्यास मूळ इंग्रजीतील विनियम ग्राह्य धरण्यात येतील.

२.३ कोणत्याही संविधी, नियम आणि विनियमांचा संदर्भ त्या त्या वेळी अंमलात असल्याप्रमाणे राहील.

## ३ व्याप्ती

भारतीय रेल्वेच्या संबंधातील या विशिष्ट अटी भारतीय रेल्वेच्या परवान्याच्या अटी म्हणून मानण्यात येतील आणि त्या येथे विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रामध्ये विजेच्या वितरणाच्या त्यांच्या कार्याचे नियमन करतील.

## ४ “वितरणाचे क्षेत्र”

४.१ वितरणाचे क्षेत्र ज्यामध्ये भारतीय रेल्वेला विजेचे वितरण करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेले वीज वितरणाचे क्षेत्र हे भारतीय रेल्वेच्या मध्य परिमंडल, पश्चिम परिमंडल, दक्षिण मध्य परिमंडल आणि दक्षिण पूर्व मध्य परिमंडलाच्या अखत्यारीतील आणि संचालनविषयक नियंत्रणातील क्षेत्र होय;

४.२ भारतीय रेल्वेने हे क्षेत्र वीज पुरवठ्याच्या क्षेत्राच्या नकाशामध्ये अधिक तपशीलवारपणे आरेखित केले आहे आणि हा नकाशा आयोगाकडे सादर केला आहे. हा नकाशा सोबतच्या अनुसूची – १ मध्ये जोडण्यात आला आहे;

४.३ भारतीय रेल्वेला अधिनियमातील तरतुदींनुसार स्व-वापरासाठी विजेचे वितरण करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे. तथापि, भारतीय रेल्वे विजेचा व्यापार अथवा मुक्त प्रवेश व्यवस्थे अंतर्गत अन्य संस्थांना विजेचा पुरवठा करणार नाही.

## ५. परवान्याची मुदत

अधिनियमातील तरतुदींच्या अधीन राहून, भारतीय रेल्वे दि. ५ नोव्हेंबर, २०१५ पासून (केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने याचिका क्र. ०१९७/एमपी/२०१५- मध्ये पारित केलेल्या आदेशाचा दिनांक, ज्या अनुषंगाने भारतीय रेल्वेने त्यांचा मानीव वितरण परवानाधारक दर्जा कार्यान्वित केला आणि मुक्त प्रवेशा अंतर्गत वितरण परवानाधारक म्हणून ग्रीडमधून वीज खेचण्यास प्रारंभ केला) पंचवीस (२५) वर्षांच्या कालावधीकरिता किंवा असा परवाना रद्द करण्यात येत नाही तोपर्यंत, यापैकी जे आधी घडेल, त्या कालावधीकरिता परवानाधारक असल्याचे मानण्यात येईल.

## ६. विशिष्ट अटी आणि परवान्याची पाहणी

हे विनियम अधिसूचित झाल्याच्या दिनांकानंतर त्वरित मानीव वितरण परवानाधारक या विशिष्ट अटी व त्याचा परवाना, मंजुऱ्या किंवा मान्यता जनतेला पाहण्यासाठी पुरविण्याची तरतूद करील.

## ७. परवान्याच्या विशिष्ट अटींमध्ये दुरुस्ती

७.१ भारतीय रेल्वेने अधिनियमाच्या कलम १८ च्या उप-कलम (१) खाली दाखल केलेल्या अर्जा अंतर्गत भारतीय रेल्वेला लागू असलेल्या विशिष्ट अटींमध्ये बदल/ अल्प-बदल करता येऊ शकेल;

७.२ भारतीय रेल्वेकडून जेव्हा असा अर्ज करण्यात येईल तेव्हा भारतीय रेल्वे महाराष्ट्र राज्यात जास्त खप असलेल्या किमान दोन इंग्रजी भाषेतील दैनिक वृत्तपत्रांमध्ये आणि किमान दोन मराठी भाषेतील दैनिक वृत्तपत्रांमध्ये अशा अर्जाची सूचना प्रसिध्द करील;

७.३ बदल किंवा अल्प-बदल करण्यासाठी अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासून सात (७) दिवसांच्या कालावधीत उपरोक्त सूचना प्रसिध्द करण्यात येईल आणि त्यामध्ये खालील तपशीलाचा समावेश असेलः-

(ए) वितरण परवानाधारकाचे नाव आणि कार्यालयाचा नोंदणीकृत पत्ता आणि/किंवा व्यवसायाचे मुख्य ठिकाण;

(बी) परवान्याच्या अशा बदल किंवा अल्प-बदलासाठी कारणमीमांसा आणि समर्थनासह फेरबदल किंवा सुधारणेचे वर्णन ज्यासाठी आयोगाकडे अर्ज दाखल करण्यात आला आहे;

(सी) त्यामुळे प्रभावित होऊ शकणा-या व्यक्तिंच्या तपशीलाचा सारांश;

(डी) बदल किंवा अल्प-बदल करण्यासाठीचा अर्ज आणि त्यामध्ये उल्लेख केलेले अन्य दस्तऐवज (व्यक्तिशः किंवा पोस्टाने) तपासणीसाठी मिळू शकतील किंवा छायाप्रती काढण्यासाठी येणा-या खर्चाइतक्या किंमतीस ज्याच्याकडून विकत घेता येतील, अशा व्यक्ती/व्यक्तींचा संपर्कासाठीचा पत्ता. याचा तपशील भारतीय रेल्वेच्या संकेत-स्थळावर प्रदर्शित करण्यात येईल, जेथून बदल किंवा अल्प-बदलासाठीचा अर्ज आणि त्यामध्ये उल्लेख केलेले अन्य दस्तऐवज मोफत उतरवून घेता येऊ शकतील;

(इ) उपरोक्त सूचना प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत कोणत्याही व्यक्तीस अर्जाच्या संदर्भात कोणतीही हरकत असल्यास तो आयोगाचे सचिव यांच्याकडे अशी हरकत लेखी (सहा प्रतींमध्ये) सादर करु शकेल, असे बदल किंवा अल्प-बदल करण्यासाठीच्या अर्जाच्या नोटीशीमध्ये नमूद करण्यात येईल;

परंतु असे की, आयोग त्यांस उचित वाटेल त्याप्रमाणे, या नोटीशीमध्ये अतिरिक्त तपशील समाविष्ट करु शकेल;

७.४ जेथे परवानाधारकाचा अर्ज नसताना परवान्यामध्ये बदल किंवा अल्प-बदल करावयाच्या असतील तेथे, प्रस्तावित बदल किंवा अल्प-बदल खालील तपशीलासह आयोग प्रसिध्द करेल -

(अ) वितरण परवानाधारकाचे नाव व त्याच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि/किंवा व्यवसायाच्या मुख्य जागेचा पत्ता;

(ब) बदल किंवा अल्प-बदलांचा तपशील व त्यासोबत परवान्यात असे बदल किंवा अल्प-बदल करण्याची कारणमीमांसा व समर्थन;

(क) त्यामुळे बाधित होण्याची शक्यता असलेल्या व्यक्तींच्या तपशीलाचा गोषवारा;

७.५ वरील विनियम ७.४ मध्ये उल्लेख केलेल्या अशा बदल किंवा अल्प-बदलांच्या संदर्भात कोणतीही हरकत कोणत्याही व्यक्तीस असेल तर वरीलप्रमाणे सूचना प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत तो आयोगाचे सचिव यांच्याकडे अशी हरकत लेखी (सहा प्रतींमध्ये) सादर करु शकेल .

७.६ या विनियमांतर्गत आलेल्या अर्जाच्या प्रक्रिये संबंधातील कार्यपध्दतीचे नियमन मविनिआ (कामकाज प्रचालन) विनियम, २००४ द्वारे करण्यात येईल.

## ८. कायदे, नियम आणि विनियमांचे पालन

८.१ भारतीय रेल्वे, अधिनियम, नियम, विनियमांचे आणि आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश व निर्देश आणि अन्य लागू असलेल्या सर्व कायद्यातील तरतुदींचे पालन करील.

८.२ भारतीय रेल्वे, अधिनियमांखालील केंद्र आणि राज्य पारेषण कंपन्या, राष्ट्रीय भार प्रेषण केंद्र, प्रादेशिक भार प्रेषण केंद्र आणि राज्य भार प्रेषण केंद्र, केंद्रीय विद्युत प्राधिकरण आणि अन्य सांविधिक प्राधिकरणांच्या विनियम, आदेश आणि निर्देशांचे उचित पालन करील.

८.३ भारतीय रेल्वे आयोगाच्या पूर्वसंमतीशिवाय अन्य कोणत्याही व्यक्तीस परवाना हस्तांतरित किंवा अभिहस्तांकित करणार नाही.

## ९. आयोगास माहिती देण्याबाबत

९.१ आयोगाच्या स्वतःच्या प्रयोजनाकरिता आवश्यक असल्यास किंवा भारत सरकार, राज्य सरकार, केंद्रीय विद्युत नियामक आयोग, केंद्रीय विद्युत प्राधिकरण, केंद्र आणि राज्य पारेषण कंपन्या आणि राष्ट्रीय, प्रादेशिक आणि राज्य भार प्रेषण केंद्रे यांना देण्याच्या प्रयोजनाकरिता, भारतीय रेल्वे त्यांच्या परवानाप्राप्त व्यवसायासंबंधीची किंवा अन्य कोणत्याही व्यवसायासंबंधीची माहिती, कागदपत्रे व तपशील आयोगाला पुरविल.

९.२ आयोग निर्देश देईल अशी माहिती ठेवणे हे भारतीय रेल्वेचे कर्तव्य असेल व या माहितीमध्ये, इतर बाबींबरोबरच, परवानाधारकाने त्यांच्या पुस्तकांमध्ये ठेवावयाची किमान माहिती, अशी माहिती कशा रितीने ठेवण्यात येईल व या संबंधात परवानाधारकाने करावयाची तपासणी आणि त्या अनुषंगाने इतर सर्व तपशीलाचा समावेश असेल.

९.३ भारतीय रेल्वे, वितरण यंत्रणेच्या कोणत्याही भागावर परिणाम करणाऱ्या कोणत्याही महत्वाच्या घटनेबाबतची माहिती आयोगास कळवेल आणि-

(अ) अशी घटना घडल्यापासून लवकरात लवकर आणि कोणत्याही परिस्थितीत ४८ तासांच्या आत, अशा घटनेबाबत पोलिसांना अहवाल देईल आणि आयोगाला कळवेल;

(ब) अशी घटना घडल्यापासून एक महिन्याच्या आत, त्या घटनेबाबत व त्यामागील कारणांबाबतच्या, त्याला माहित असलेल्या वस्तुस्थितीचा, संपूर्ण तपशीलवार अहवाल, आयोगास सादर करेल;

(क) जर वरील उप-खंड (ब) मधील अहवाल पाठविण्यास, घटना घडल्याच्या दिनांकापासून एक महिन्याहून अधिक कालावधी लागण्याची शक्यता असेल तर, भारतीय रेल्वे घटना घडल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, घटनेच्या व त्यामागील कारणांच्या, त्याला सहजपणे देता येईल त्या तपशीलांसह एक प्राथमिक अहवाल आयोगास सादर करेल व अशा घटनेचा पूर्ण अहवाल देण्यासाठी भारतीय रेल्वेला एक महिन्यापेक्षा अधिक कालावधी का लागणार आहे; याबाबतची कारणे त्यात नमूद करेल; आणि

(ड) आयोग निदेश देईल त्याप्रमाणे अहवालाच्या प्रती राज्य शासन, केंद्र व राज्य पारेषण कंपन्या, केंद्रीय विद्युत प्राधिकरण, आणि अन्य व्यक्तींना देईल.

९.४ कोणती घटना महत्वाचा बिघाड म्हणून मानण्यात यावी, याबाबत आयोगाचा निर्णय अंतिम राहील.

९.५ आयोग स्वेच्छाधिकाराने, एखाद्या महत्वाच्या घटनेबाबत, स्वतंत्र व्यक्तीचा अहवाल सादर करण्यास, सांगू शकेल.

परंतु असे की, असा अहवाल तयार करण्याचा खर्च भारतीय रेल्वेला करावा लागेल.

९.६ आयोग, भारतीय रेल्वेस कोणताही महत्वाचा बिघाड टाळण्यासाठी वितरण यंत्रणेमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि वितरण व्यवसायाच्या संबंधित कोणत्याही इतर बाबतीत, जनहिताच्या दृष्टिकोनातून, आयोगास आवश्यक वाटेल असा अभ्यास करुन घेण्यास, वेळोवेळी निदेश देऊ शकेल.

९.७ भारतीय रेल्वे त्यांच्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटींचे पालन करण्यास प्रतिबंध करणाऱ्या कोणत्याही घटनेची, तसेच इतरांनी केलेल्या किंवा न केलेल्या कृतीबाबतची महिती, आणि अशा घटनेचा परिणाम सौम्य करण्यासाठी त्याने केलेल्या उपाययोजनांची माहिती आयोगाला कळविल.

९.८ भारतीय रेल्वे त्यांच्या वितरण यंत्रणेची उभारणी, संचालन आणि देखभाल कार्यक्षम, सुरक्षित, समन्वयित आणि काटकसरीच्या पध्दतीने तसेच केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने अधिसूचित केलेल्या लागू असलेल्या विनियमांचे यथोचित पालन करण्याची खात्री करील.

## १० परवाना शुल्क अदा करणे

१०.१ परवाना अंमलात असण्याच्या दरम्यान, भारतीय रेल्वे दरवर्षी १० एप्रिल रोजी किंवा आयोग परवानगी देईत त्या अन्य अशा वेळेत, मविनिआ (शुल्क आणि आकार) विनियम, २०१७ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले परवाना शुल्क अदा करील.

१०.२ भारतीय रेल्वेने प्रत्येक वर्षीच्या १० एप्रिलपर्यंत किंवा आयोगाने मंजूर केलेल्या अन्य कालावधीत शुल्क अदा केले नाही तरः

(ए) अन्य दायित्वांना बाधा न येता, परवाना शुल्क अदा करण्यात झालेल्या विलंब प्रकरणी, भारतीय रेल्वे विलंब भरणा आकार म्हणून विलंबित रकमेवर दरमहा १.२५ टक्के दराने सरळ व्याज अदा करण्यास जबाबदार राहील. आणि

(बी) आयोग अधिनियमाच्या तरतुदीनुसार वितरण परवाना रद्द करु शकेल.

## ११. परवाना रद्द करणे

११.१ विद्युत अधिनियमाच्या कलम १९ मधील तरतुदींच्या अधीन राहून, जर आयोगाच्या मते जनहिताच्या दृष्टीकोनातून आवश्यक वाटल्यास, आयोग, त्यास उचित वाटतील अशा अटी व शर्तीवर, भारतीय रेल्वेचा परवाना, त्याच्या वितरणाच्या संपूर्ण

क्षेत्रासाठी किंवा कोणत्याही भागाकरिता, त्यासंबंधीची कारणे लेखी नमूद करुन, रद्द करु शकेल.

११.२ आयोग, वितरण परवाना रद्द करण्यापूर्वी, त्याच्या मते आवश्यक वाटल्यास, ही बाब राज्य शासनास संदर्भ करेल आणि वितरण परवानाधारकाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी करावयाच्या व्यवस्थेबाबत निर्णय घेईल.

११.३ परवाना रद्द करण्या संबंधातील अशा प्रक्रियेचे नियमन मविनिआ (कामकाज प्रचालन) विनियम, २००४ द्वारे करण्यात येईल.

## १२ राज्य ग्रीड संहितेचे पालन

१२.१ राज्य ग्रिड संहितेमधील, वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेच्या संचालनास किंवा अन्यथा त्याच्या कोणत्याही कामकाजास लागू असतील त्या तरतुदींचे पालन भारतीय रेल्वे करील.

१२.२ राज्यातील बाधित झालेल्या कोणत्याही विद्युत निर्मिती कंपन्या, पारेषण परवानेधारक, वितरण परवानेधारक, राज्य पारेषण कंपनी, राज्य भार प्रेषण केंद्र आणि विद्युत व्यापारी यांच्याशी सल्लामसलत करुन, आयोग निदेशित करेल अशा राज्य ग्रिड संहितेमधील भागांच्या संबंधात आणि त्या मर्यादेपर्यंत, विनियमाखाली असलेल्या बंधनातून, भारतीय रेल्वेस मुक्त करण्याबाबतचे निर्देश आयोग देऊ शकेल.

## १३ स्टॅंडबाय व्यवस्था

एक) हे विनियम शासकीय राजपत्रात अधिसूचित झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत भारतीय रेल्वे योग्य आणि पुरेशा राखीव पुरवठ्याचा व्यवस्था/करार करील.

दोन) अशा स्टॅण्डबाय पुरवठ्याच्या व्यवस्थेची/कराराची अशी स्टॅण्डबाय क्षमता भारतीय रेल्वेने दीर्घ-कालिन तत्त्वावर करारबध्द केलेल्या निर्मिती संचाच्या सर्वात मोठ्या संचाच्या आकाराच्या समकक्ष असेल.

तीन) अशी व्यवस्था/करार करण्यापूर्वी, भारतीय रेल्वे महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राशी उचित सल्लामसलत करील आणि या व्यवस्थेबाबत त्यांच्या लेखी संमतीची मागणी करील.

## १४ वीज प्राप्तीची योजना

भारतीय रेल्वेला प्रस्तावित कर्षण उप-केंद्राच्या ठिकाणासह त्यांची वीज प्राप्तीची योजना राज्य पारेषण कंपनी आणि महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला सादर करावी लागेल. शासकीय राजपत्रात हे विनियम अधिसूचित झाल्यापासून एक महिन्याच्या आत  वीज प्राप्तीची योजना सादर करावी लागेल. तसेच, भविष्यात या योजनेमध्ये कोणताही बदल करण्याप्रकरणी, भारतीय रेल्वेला सुधारित योजना सादर करावी लागेल.

## १५. मुक्त प्रवेश आकाराचे प्रदान

१५.१ भारतीय रेल्वे क्रॉस सबसिडी अधिभार आणि मुक्त प्रवेश विनियमांतर्गत लागू असलेले अन्य आकार पदस्थ परवानाधारकाला अदा करील.

१५.२ शासकीय राजपत्रात हे विनियम अधिसूचित झाल्यानंतर ताबडतोब असे मुक्त प्रवेश आकार अदा करावे लागतील.

## १६. आयोगाने अधिसूचित केलेल्या वेगवेगळ्या विनियमांची प्रयोज्यता

भारतीय रेल्वेला खालील विनियम आणि त्यामधील सुधारणा आणि त्याखालील नियम/कार्यपध्दती/मार्गदर्शक सूचना यांचे पालन करावे लागेलः

१. मविनिआ (राज्य ग्रीड संहिता) विनियम, २००६.
२. मविनिआ (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०१६
३. मविनिआ ( नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन), विनियम, २०१६
४. मविनिआ (शुल्क व आकार ) विनियम, २०१७
५. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (सौर आणि पवन ऊर्जा निर्मितीकरिता पूर्वानुमान, काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) आणि तफावतीची हिशोबपूर्ती) विनियम, २०१८
६. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक यंत्रणांकरिता नक्त मापन) विनियम, २०१५
७. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१५

८. मविनिआ उपलब्धतेवर आधारित वीज दर आदेशाअंतर्गत मेरीट ऑर्डर डिस्पॅचच्या (कमी किमतीची वीज प्रथम खरेदी करणे) कार्यवाहीसाठी मार्गदर्शक सूचना
९. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपध्दती आणि संबंधित बाबी) विनियम, २०१९
१०. आयोगाने सन  २००७ च्या प्रकरण क्र. ४२ मध्ये (एबीटी) आदेश आणि एफबीएसएम कार्यपध्दती
११. बहु-वर्षीय वीज दर विनियमांतर्गत विनिर्दिष्ट केलेल्या पारेषण किंमतीची चौकट (आयोगाने दि. १२ सप्टेंबर, २०१८ रोजी पारित केलेला राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा आदेश आणि आयोगाने निर्गमित केलेले भारतीय रेल्वेच्या संबंधात अन्य संबंधित आदेश/निर्देश)
१२. आयोगाचे आदेश/कार्यप्रणाली निर्देश/सुधारणा, भारतीय रेल्वेसंबंधात वर उल्लेख केलेल्या विनियमांमध्ये असल्यास.

## ८ दुरुस्ती करण्याचे अधिकार

आयोग, कोणत्याही वेळी, या विनियमांतील कोणत्याही तरतुदीमध्ये बदल, फेरफार, अल्प-बदल आणि सुधारणा करु शकेल.

## ९ अडचणी दूर करण्याचे अधिकार


या विनियमांतील तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण आली तर आयोगाला सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशाने, विद्युत अधिनियमातील तरतुदींशी विसंगत नसतील अशा परंतु अडचण दूर करण्यासाठी आवश्यक अशा तरतुदी करता येतील.

अभिजीत देशपांडे
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

मुंबई,
दिनांक :  ९ डिसेंबर, २०१९

# अनुसूची - १

ANNEXURE - 2 -





CENTRAL RAILWAY
POWER SUPPLY NETWORK FOR AC TRACTION TSS
(AS ON 01.04.2014)

CENTRAL RAILWAY

मध्य रेल

ANNEXURE-1




CENTRAL RAILWAY
मध्य रेल

# CENTRAL RAILWAY
## SYSTEM MAP

W. E. F. 1st APRIL 2019.

SCALE : NOT TO SCALE.




### INTERCHANGE STATION

| DIVISION | DIRECTION | STATION | STATION OF | TO RLY. |
|---|---|---|---|---|
| MUMBAI | NORTH WEST | VASAI RD. | WR | WR |
| | SOUTH EAST | ROHA | CR | KRCL |
| BHUSAWAL | SOUTH WEST | MANMAD | CR | SCR |
| | SOUTH WEST | JALGAON | CR | WR |
| | NORTH EAST | KHANDWA | CR | WCR |
| NAGPUR | NORTH WEST | ITARSI | WCR | WCR |
| | CENTRAL | NAGPUR | CR | SECR |
| | SOUTH EAST | BALLARSHAH | CR | SCR |
| | SOUTH EAST | PIMPALKUTTI | CR | SCR |
| PUNE | SOUTH EAST | MIRAJ | CR | SCR |
| SOLAPUR | SOUTH EAST | WADI | CR | SCR |

### ROUTE KILOMETRES — As on 1st April 2019

| GROUP | B. G. 1.676 m | N. G. 0.762 m | N. G. 0.610 m | TOTAL |
|---|---|---|---|---|
| GROUP 'A' | 1263.95 | — | — | 1263.95 |
| GROUP 'B' | 696.26 | — | — | 696.26 |
| GROUP 'C' | 96.98 | — | — | 96.98 |
| GROUP 'D' | 466.11 | — | — | 466.11 |
| GROUP 'D' Spl. | 236.61 | — | — | 236.61 |
| GROUP 'E' | 1093.40 | — | — | 1093.40 |
| NARROW GAUGE | — | 278.32 | 20.29 | 298.61 |
| TOTAL KMS. | 3853.32 | 278.32 | 20.29 | 4151.93 |

### RUNNING TRACK KILOMETRES

| GROUP | B. G. 1.676 m | N. G. 0.762 m | N. G. 0.610 m | TOTAL |
|---|---|---|---|---|
| GROUP 'A' | 2608.10 | — | — | 2608.10 |
| GRUOP 'B' | 1235.79 | — | — | 1235.79 |
| GROUP 'C' | 289.46 | — | — | 289.46 |
| GROUP 'D' | 609.25 | — | — | 609.25 |
| GROUP 'D' Spl. | 236.61 | — | — | 236.61 |
| GROUP 'E' | 1120.95 | — | — | 1120.95 |
| NARROW GAUEGE | — | 278.32 | 20.29 | 298.61 |
| TOTAL KMS. | 6100.16 | 278.32 | 20.29 | 6398.77 |

### STATE WISE ROUTE KILOMETRES

| STATE | COLOUR | B. G. 1.676 m | N. G. 0.762 m | N. G. 0.610 m | TOTAL |
|---|---|---|---|---|---|
| MADHYA PRADESH | | 394.42 | — | — | 394.42 |
| MAHARASHTRA | | 3358.69 | 278.32 | 20.29 | 3657.30 |
| KARNATAKA | | 100.21 | — | — | 100.21 |
| TOTAL KMS. | | 3853.32 | 278.32 | 20.29 | 4151.93 |

### DIVISION WISE ROUTE KILOMETRES

| DIVISION | COLOUR | B. G. 1.676 m | N. G. 0.762 m | N. G. 0.610 m | TOTAL |
|---|---|---|---|---|---|
| MUMBAI | | 555.48 | — | 20.29 | 575.77 |
| BHUSAVAL | | 803.19 | 243.90 | — | 1047.09 |
| NAGPUR | | 958.70 | 34.42 | — | 993.12 |
| PUNE | | 531.15 | — | — | 531.15 |
| SOLAPUR | | 1004.79 | — | — | 1004.79 |
| | TOTAL KMS. | 3853.32 | 278.32 | 20.29 | 4151.93 |

### ELECTRIFIED SECTION KILOMETERS

| | RKM | TKM |
|---|---|---|
| 25KV AC | 2728.00 | 7047.00 |


(S. P. S. GUPTA)
CHIEF ENGINEER (PL)

(S. P. KULSHRESHTHA)
DY. CHIEF ENGINEER (PL)

Compiled and Drawn by:
P. N. ADAM, SSE(DD)


# SYSTEM MAP OF WESTERN RAILWAY AS ON 31-03-2019

(NOT TO SCALE)




BG,MG AND NG ROUTE KILOMETRES

| ITEM | BG | MG | NG |
|---|---|---|---|
| ELECTRIFIED | 1776.85 | - | - |
| NON ELECTRIFIED | 3028.65 | 1154.96 | 558.90 |
| TOTAL | 4805.50 | 1154.96 | 558.90 |




# दक्षिण मध्य रेलवे
# SOUTH CENTRAL RAILWAY

## SYSTEM MAP मान चित्र
## AS ON 31-03-2019

### DIVISION LEGEND

- SECUNDERABAD
- HYDERABAD
- VIJAYAWADA
- GUNTAKAL
- GUNTUR
- NANDED
- OTHER RAILWAYS
- STATE BOUNDARY
- BROAD GAUGE SINGLE LINE DOUBLE LINE AND TRIPLE LINE
- BROAD GAUGE ELECTRIFIED SINGLE LINE DOUBLE LINE AND TRIPLE LINE
- METRE GAUGE SINGLE LINE DOUBLE LINE
- RAILWAY HEAD QUARTERS
- DIVISIONAL HEAD QUARTERS


| STATE WISE ROUTE/RUNNING TRACK KM. | | |
|---|---|---|
| STATE | ROUTE | RUNNING |
| ANDHRA PRADESH | 2844.544 | 4120.731 |
| TELANGANA | 1822.682 | 2552.696 |
| MAHARASHTRA | 1102.695 @ | 1180.635 @ |
| KARNATAKA | 387.169 | 577.129 |
| MADHYA PRADESH | 70.180 # | 70.180 # |
| TAMILNADU | 6.860 | 6.860 |
| TOTAL | 6234.130 | 8508.231 |

@ - INCLUDES 105.750 KM (M.G.)

# - M.G.

| DIVISION WISE ROUTE/RUNNING TRACK KM. | | |
|---|---|---|
| DIVISION | ROUTE | RUNNING |
| SECUNDERABAD | 1551.352 | 2345.770 |
| VIJAYAWADA | 964.212 | 1652.480 |
| GUNTAKAL | 1451.641 | 2145.400 |
| GUNTUR | 629.516 | 660.992 |
| HYDERABAD | 651.614 | 678.434 |
| NANDED | 985.795 $ | 1025.155 $ |
| TOTAL | 6234.130 | 8508.231 |

$ - INCLUDES 175.930 KM (M.G.)



दक्षिण पूर्व मध्य रेलवे
SOUTH EAST CENTRAL RAILWAY
प्रणाली मानचित्र
SYSTEM MAP - 2019
N
01.04.2019 से प्रभावी / WITH EFFECT FROM 01.04.2019
संकेत / LEGEND
B.G. SINGLE LINE
B.G. DOUBLE LINE
B.G. TRIPLE LINE
B.G. NEW LINE UNDER CONSTRUCTION
B.G. DOUBLING UNDER CONSTRUCTION
B.G. TRILPE LINE UNDER CONSTRUCTION
B.G. FOURTH LINE UNDER CONSTRUCTION
N.G.TO B.G. UNDER GAUGE CONVERSION
B.G. ELECTRIFIED LINE SINGLE LINE/ DOUBLE LINE / TRIPLE LINE
RAILWAY FLY OVER SANCTIONED
ZONAL RAILWAY HEADQUARTERS
DIVISIONAL HEADQUARTERS
IBP ON SINGLE LINE / DOUBLE LINE
TOURIST PLACES
OTHER RAILWAY
DISTRICT BOUNDARY
STATE BOUNDARY
म ध्य
MADHYA
प्र दे श
PRADESH
छ त्ती स ग ढ़
CHHATTISGARH
झा र खं ड
JHARKHAND
ओ डि शा
ODISHA
म हा रा ष्ट्र
MAHARASHTRA
ते लं गा ना
TELANGANA
BINA W.C Rly.
KATNI
KATNI MURWARA
KATNI SOUTH
NEW KATNI (NKJ) 1034.822
CHOPAN E.C Rly.
ALLAHABAD N.C.Rly.
JHALWARA (JLW) 1025.100
UMARIA (UMR) 977.300
BIRSINGHPUR (BRS) 947.600
GHUNGHUTI (GGT) 931.300
SHAHDOL (SDL) 910.300
BANDHAVGARH NATIONAL PARK
BURHAR (BUH) 890.700
ANUPPUR JN.(APR) 869.300
CHHULHA (CLF) 864.100
BAIKUNTHPUR ROAD (BRH) 968.100
DARRITOLA (DTL) 952.100
NAGPUR ROAD PH 947.522
BORIDAND JN (BRND) 926.000
BIJURI (BJRI) 916.300
MAUHARI (MZH) 876.900
SHEOPRASAD NAGAR PH (SPDR) 994.900
BISRAMPUR (BSPR) 1024.300
AMBIKAPUR (ABKP) 1044.81
SARNADIH
BARWADIH
MAINPAT
PARSA
TIGER HILL (TGH) 962.500
AMRIT DHARA WATER FALL
CHIRIMIRI (CHRM) 955.400
RAJNAGAR B.H.(RBHB) 922.555
VENKAT NAGAR (VKR) 837.900
PENDRA ROAD (PND) 819.200
AMARKANTAK
KHODRI (KOI) 807.500
SENDURGARH
KHONGSARA (KGS)784.000
BELGHANA (BIG) 765.800
KARGI ROAD (KGB) 750.200
RATANPUR
USLAPUR (USL) 726.800
BILASPUR JN (BSP) 718.400
GEVRA ROAD (GAD) 710.500
MAND COLLIERY
DHARAMJAIGARH ROAD
KORBA (KRBA) 702.400
GHARGHODA
SARAGAON DEORI (SRGD) 657.490
BHUPDEOPUR (BEF) 602.200
SAKTI (SKT) 635.700
KIRODIMAL NAGAR (KDTR 593.600
RAIGARH (RIG) 585.700
JAMGA (JMG) 567.600
JHARSUGUDA JN. (JSG)514.244(S. E. RLY.)
HOWRAH (HWH) S.E.Rly.
JSG ROAD 516.316
BRUNDAMAL (BXQ) 520.658(E.Co. RLY.)
SAMBALPUR ( E Co. RLY.)
TITLAGARH E. Co. RLY.
TALCHER Rd. E. Co. RLY.
ROBERTSON (ROB) 611.500
HIMGIR (HGR) 548.200
BRAJRAJNAGAR (BRJN) 525.800
JANJGIR NAILA (NIA) 676.600
KHARSIA (KHS)619.700
CHAMPA JN (CPH) 665.900
BELHA (BYL) 734.100
DAGORI (DGS) 741.100
NIPANIA (NPI) 750.200
BHATAPARA (BYT)764.600
HATHBANDH (HN) 779.900
TILDA (TLD) 790.800
MANDHAR (MDH) 816.600
BALODA BAZAR
LAKHOLI (LAE)858.643
RAIPUR JN. (R) 828.600
NAYA RAIPUR
BHILAI POWER HOUSE (BPHB) 856.200
KUMHARI (KMI) 841.00
RAJNANDGAON (RJN) 896.389
DONGARGARH (DGG) 927.595
DURG JN (DURG) 865.500
KENDRI PH (KDRI) 22.000
ARANG MAHANADI (ANMD) (E.Co. Rly.)
RAJIM (RIM) 44.100
CHAMPARAN
ABHANPUR JN (AVP) 27.700
SARSONPURI PH (SPY) 61.500
DHAMTARI PH (DTR) 72.000
BALOD (BXA) 929.000
KUSUMKASA (KYS) 946.700
DALLIRAJHARA (DRZ) 953.100
GUDUM (GUDM) 970.120
BHANUPRATAPPUR (BPTP) 985.793
ANTAGARH 1013.943
JAGDALPUR (JDB) E.Co. RLY.
VISAKHAPATNAM E.Co. RLY.
KIRANDUL E.Co. RLY.
GONGLEE (GNL) 1031.560
SONDAD(SNV)1048.331
TUMSAR RD.JN (TMR)1050.487
GONDIA JN. (G) 1000.7 B.G./1002.081 For Br. Line
BIRSOLA (BRA) 1018.674
BALAGHAT JN. (BTC)1042.885
SAMNAPUR (SMC) 1058.694
NAGARWARA (NWA) 1091.903
GUDRU PH (GDU) 1098.628
CHIRAIDONGRI PH (CID) 1137.779
KANHA NATIONAL PARK
ACHANAKMAR AVAYARANYA
MANDLA FORT(MFR)1161.574
NAINPUR JN (NR)1118.900
QUEEN DURGAVATI FORT
BARGI DAM
GWARIGHAT (GRG) 1217.834
BHEDA GHAT WATER FALL
JABALPUR JN (JBP)1229.217
KACHHPURA
GARHA 1226.855
ITARSI W.C. Rly
SUKRI MANGELA PH (SOY) 1188.319
GHONSORE (GNS) 1153.505
PUTARRA PH (PRTR) 1138.894
KEOLARI (KLZ) 1141.918
KANHIWARA PH (KWB) 1167.113
SEONI (SEY) 1194.822
KARABOH (KRBO) 1225.782
CHHINDWARA JN. (CWA) 1257.619
UMRANALA (ULA) 1281.873
BHIMAL GONDI (BMC)1311.114
GHADELA PH (GELA) 1315.599
SAUSAR (SASR)1329.722
PARAD SINGA PH (PSK)1345.919
SAONER (SONR) 1366.021
AMLA C.Rly.
GODHANI C.Rly.
NAGPUR JN (NGP) 1130.661 FROM HOWRAH
NAGPUR (NGP)
ITWARI JN (ITR)1127.000(B.G.)
PENCH NATIONAL PARK
BHANDARKUND(BDKD) 1291.580
KATANGI (KGE) 1089.791
TIRODI (TRDI) 1097.273
GARRA PH (GRHX) 1050.393
SAONGI PH (SGC)1068.528
GANGAJHARI (GJ) 1015.169
RAMTEK(RTK) 1134.960
BHANDARA RD. (BRD) 1068.498
KANHAN JN (KNHN) 1111.965
KALUMNA(KAV) 1124.308
NAVELGAON NATIONAL PARK
UMRER (URR) 1187.825
ARJUNI (AJU)1081.503
WADEGAON (WDG) 1089.188
WADSA (WSA) 1105.331
BHIWAPUR (BWV) 1164.768
NAGBHIR JN(NAB) 1133.706
MINDALA PH (MWG)1140.506
GADCHIROLI 49.500
SINDEWAHI (SYE) 1169.518
RAJOLI (ROL) 1182.794
MARODA (MRDA) 1195.465
TALEWAHI PH (TWI) 1206.788
CHANDA FORT (CAF) 1240.530
CHANDRAPUR C.RLY.
BALLHARSHAH (BPQ) C.RLY.
WARANGAL S.C. RLY.
TADALI Jn. (C. RLY.)
GHUSGUS C. RLY.
WARDHA C.Rly.
BHUSAWAL Jn. C. Rly.